महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५८

# सयाजीराव गायकवाड धर्म विषयक विचार

बाबा भांड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५८

# सयाजीराव गायकवाड
# धर्म विषयक विचार

बाबा भांड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

सयाजीराव गायकवाड
धर्म विषयक विचार
इतिहास
बाबा भांड
●
प्रकाशन क्रमांक - ७८
पहिली आवृत्ती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : बाबा भांड (सचिव)
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २३ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

| | |
|---|---|
| **दिनेश पाटील** | **बाबा भांड** |
| संपादक | सचिव |
| **महाराजा सयाजीराव** | **महाराजा सयाजीराव गायकवाड** |
| **ज्ञानमाला ई बुक प्रकल्प** | **सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद** |

●●●



# सयाजीराव गायकवाड
# धर्म विषयक विचार

महाराज सयाजीराव चौसष्ट वर्षांची कारकीर्द म्हणजे विविध सुधारणांचा चालता बोलता इतिहास आहे. राज्यकारभार हाती येताच या राजाने जनकल्याणासाठी पंचसूत्री कार्यक्रमाची आखणी केली. १) शिक्षणाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे, ते प्रजेला देणं पहिलं काम. २) उद्योगधंदे आणि व्यापार ही प्रगतीची दोन चाकं आहेत, त्यामुळे श्रीमंत-गरिबातील अंतर कमी करता येईल. ३) उच्चनीच, हा श्रेष्ठ तो कनिष्ठ या भावनांचा प्रत्येकाने त्याग करावा. ४) सुख आणि दु:ख हे आयुष्यातील सावलीचा खेळ आहे, म्हणून कर्तव्य आणि कर्म करण्यातच मोक्ष आहे. ५) कोणतेही काम करताना स्वार्थ आणि फळाची अपेक्षा न करणे हाच धर्म आहे,

तरुणपणातील सयाजीरावांचे चौफेर वाचन, सर्वसंग्राहकता, बुद्धीची परिपक्वता आणि निरनिराळे धर्म-संस्कृतीचा तौलनिक अभ्यास झाल्याने त्यांची दृष्टी विशाल बनत गेली. या व्यासंगाचे चित्रण त्यांच्या एकूण भाषणात, लेखनात आणि पत्रव्यवहारात

स्पष्टपणे पडलेलं दिसते. राज्यप्रशासन, इतिहास आणि भूगोल हे विषय त्यांना मनापासून आवडत; पण त्या बरोबरच तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र हे विशेष आवडत. या विषयातील नवनवे ग्रंथ मिळवून ते वाचीत. आवडलेल्या भागावर खुणा करीत, टिपणं काढीत.

तुकाराम हे सयाजीरावांचे आवडते कवी. तुकाराम गाथांचे अनेक पारायणं त्यांनी केली. १८८१ साली रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई सयाजीरावांकडे नोकरीवर रुजू झाले. लेखनिक, पुस्तक वाचून दाखविणे आणि पत्रव्यवहार पाहणे ही कामे करू लागले. यावेळी तुकाराम गाथा वारंवार वाचून घेत. १८९९ साली भयानक दुष्काळ पडला. दुसरं वर्षही तसंच गेलं. पीकपाणी आलं नाही. माणसं आणि जनावरांची उपसमार सुरू झाली. सयाजीरावांनी दुष्काळी भागात बैलगाडी अन् घोड्यावर बसून दुर्गम भागातील दौरा केला. माणसांना अन्न आणि जनावरांना चारा पुरविला. दुष्काळी कामं सुरू केली. दिवसभर ते गावोगाव फिरत. मरणारी जनावरं आणि माणसं बघून हा राजा सर्व प्रकारची मदत करत होता. तंबूत मुक्काम करत. रात्री कंदिलाच्या उजेडात तुकारामाचे अभंग वाचत. दुष्काळासंबंधीच्या तुकारामाच्या अभंगाने ते आणखी अस्वस्थ झाले, असे त्यांचे सोबतचे अधिकारी खासेराव जाधवांनी आठवणीत लिहून ठेवले आहे.

सयाजीरावांनी धर्मशास्त्राचे बारकाईने वाचन केले. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या धर्मानुसार वागण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे, असे ते मानू लागले. यासाठी देवघर शाखेचे रूपांतर धर्मखात्यात केले. हिंदू धर्मासोबत जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मातील पुस्तके मराठी-गुजरातीत भाषांतरित केली. इतर धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला. एवढेच नाही तर ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध, जैन, झोरास्ट्रियन आणि हिंदू धर्मातील तत्त्वे शिकविणारा वर्ग सुरू केला.

सयाजीराव म्हणत, सर्व धर्मीयांबद्दल आदर बाळगावा; मात्र कोणत्याही धर्माने रूढी-परंपरांचं पांघरूण घेऊन थोतांड अन् माणसाची फसवाफसवी करू नये. प्रत्येक माणसास धर्मस्वातंत्र्य हवे; पण त्यासाठी कोणाही मध्यस्थाची, दलालाची आवश्यकता नाही. महाराजांनी अभ्यासू माणसांच्या मदतीने वेद आणि धर्मग्रंथाचे सार समजून घेतले. वेदोक्ताचा अधिकार फक्त ब्राह्मणास आहे, इतरांना नाही, असा कोठेही धर्मग्रंथात आधार नाही.

प्रत्येक माणूस ईश्वराचा लेकरू आहे. ईश्वराची प्रार्थना, पूजा करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे. कोणत्याही एका जातीची ती मत्तेदारी नाही; तसेच क्षत्रियांनी वेदोक्ताऐवजी पुराणोक्त पद्धती वापरावी, यालाही शास्त्राधार नाही, हे सयाजीरावांनी ओळखले. यावर उपाय म्हणून १८९६ ला ब्राह्मणेतरांसाठी मराठीतून वेदोक्त शाळा सुरू केली. राजवाड्यात वेदोक्त पद्धतीने पूजा विधी

सुरू केला. पूजाविधीचे संस्कृत ग्रंथ मराठी-गुजराथीत छापले. ही गोष्ट सनातन आणि वेदोक्तपद्धतीचा पाठपुरावा करणाऱ्या काही मंडळीस आवडली नाही. त्यांच्यात असंतोष वाढू लागला. कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण सुरू होण्यापूर्वी सयाजीरावांनी बडोद्यात हा प्रश्न सामंजस्य आणि मध्यम मार्गांनी कुशलतेने हाताळला.

या काळात धर्मखात्यात सयाजीरावांनी आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. पुरोहित धर्मशास्त्रानुसार पूजा-विधी करत असतात. हा वर्षानुवर्षे त्याचा व्यवसाय आहे. एखाद्या व्यक्तीस करायचा झाल्यास, त्याला त्याचे ज्ञान हवं., उदाहरणार्थ डॉक्टर, शिक्षक, इंजिनिअर, वकील हे त्या त्या व्यवसायाचे शिक्षण घेतात. परीक्षा पास  होऊन व्यवसाय करतात. त्यांना त्या व्यवसायाचं ज्ञान असते. परीक्षा पास झाल्याचे त्यांच्याकडे प्रमाणपत्र असते. पुरोहिताचाही व्यवसाय आहे. या पुरोहितांना धर्मशास्त्र, पूजापाठ आणि मंत्रविधीचं पुरेसे ज्ञान आहे की नाही तपासण्याचा सरकारचा अधिकार आहे. जे पुरोहित ही परीक्षा पास होतील, त्यांनाच प्रमाणपत्र दिले जाईल. त्यानंतरच ते पुरोहित व्यवसाय करण्याचे कायद्याने लायक आहेत. यात आणखी एक अट घातली. पूजा-मंत्रविधीतील संस्कृतमंत्रांचा अर्थ यजमानास त्यांच्या भाषेत सांगण्याची सक्ती केली. या निर्णयाने जुन्या पंडित मंडळींनी थोडा विरोध केला. असमाधानातून कुरबुरही वाढली; पण व्यवसाय न सोडता पुरोहित मंडळी नव्या कायद्यानुसार धर्मकार्य करू लागली.

भोजनाप्रसंगीच्या सोवळेओवळे आणि पंगतिभेद पद्धतीलाही सयाजीरावांनी फाटा दिला. दानधर्मासाठी नियम केले. धर्मार्थ दानासही बंधनं टाकली. संन्यास घेण्यासाठी नियम केले. अविचारी दानामुळे धंदेवाईक भिकारी वाढतात. ऐदी लोकांची वाढ होणे अनहितच आहे. यामुळे काम करू शकणारी माणसे कंगाल होतात, हे त्यांनी ओळखले होते आणि याकरिता कायदे केले.

शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणात मुलांना धर्मशिक्षणाचीही ओळख हवी; पण ते शिक्षण नैतिकतेचे असले पाहिजे. अधर्माने व सामान्यांना लुबाडून धंदा करू नये. माणसाला माणूस म्हणून जगण्यास धर्म मदत करू शकला पाहिजे.

सयाजीरावांनी मॅकियावेलीच्या द प्रिन्स या राजकीय गीतेचा चांगला अभ्यास केला होता. धर्मसंस्था आणि राजसत्तेने आपापली लक्ष्मणरेषा ओळखली पाहिजे, असे ते म्हणत. धर्ममूल्ये आणि नागरीमूल्ये यांची सांगड घालण्याचे कौशल्य विवेकी प्रशासकात असली पाहिजेत. ईश्वराची नेमकी व्याख्या काय करावी आणि परिवर्तनशील जगात धर्माचे स्थान काय हा विचार ते वेळोवेळी स्पष्ट मांडत आले. शिकागो येथील पहिल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी एक वक्ता म्हणून चांगले भाषण केले. त्यानंतर दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्षस्थान सयाजीराव गायकवाड यांनी भूषविले.

१९३३ च्या जागतिक धर्म परिषदेत सयाजीराव स्पष्ट म्हणाले, ईश्वर ही मुळात मनुष्यनिर्मित संकल्पना असून तो लोकसत्ताक राज्यातल्या राजासारखा गरिबांचा कैवारी असतो. हा त्यांचा विचार सर्वधर्मसमभाव आणि समतेचा संदेश देणारा आहे. परमेश्वर हा सच्चिदानंदस्वरूप असून जन ही त्याची वेशभूषा आहे, अशी देव संकल्पना त्यांनी या भाषणातून व्यक्त केली आहे. चार्वाक, गौतम बुद्ध, श्रीकृष्ण, गांधी या महात्म्यांनी आणि कबीर, तुकाराम, तुलसीदास या साधुसंतांनी धर्माच्या बाबतीत जी व्यवहारबुद्धी दाखवली आहे ती महत्त्वाची आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण, संवर्धन आणि समान वाटप होण्यासाठी विश्वबंधुत्वाची भावना रुजवण्याची जो धर्म मानवाच्या उपयोगी पडेल, तोच खरा धर्म आहे. खऱ्या धर्मामुळे धर्मातील पोकळ अवंडबर दूर होऊन तो सामान्य माणसाला दोन वेळेच्या भाकरीप्रमाणे ओळखता यावा असा सहज धर्मच जनसामान्याला जगण्याची दिशा दाखवेल.

सयाजीराव महाराजांच्या या धार्मिक सुधारणा बडोद्यातील काही मंडळींना आवडत नव्हत्या. नाराज झालेल्या सनातन विचारांच्या मंडळीत सत्तेला विरोध करण्याची हिंमत नव्हती; पण सयाजीरावांच्या या कामाला पायबंद घालण्याचा प्रयत्न झाला. त्याचं बोलकं उदाहरण पुढे देत आहे.

१९०१ सालचा सप्टेंबर महिना होता. स्वामी हंसस्वरूप नावाचे एक विद्वान संन्यासी होते. या नाराज मंडळींनी त्यांना बडोद्यास निमंत्रण दिले. स्वामीचे इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषांतर अप्रतिम प्रभुत्व होते. त्यांचा आवाज महासागरासारखा, खर्ज प्रचंड आणि वाणी रसवंती होती. सनातन हिंदू धर्माबद्दल ते देशभर व्याख्यानांमुळे लोकप्रियही होते. हंसराज स्वामी बडोद्यात येण्यापूर्वी सयाजीरावांनी आर्यसमाजी साधू नित्यानंद आणि विश्वेश्वरानंद यांची भाषणे आयोजित केली होती. महाराजांना आर्यसमाजाची विचारधाराही जवळची वाटायची. त्यामुळे आर्यसमाजाचे कार्यकर्ते पंडित आत्माराम यांना शिक्षण विभागात इन्स्फेक्टर नेमले होते. महाराजांनी अस्पृश्य आणि आदिवासी या वंचित समाजाच्या मुलांसाठी शाळा, वसतिगृहे काढली होती. या शाळा वसतिगृहांची व्यवस्था पंडित आत्माराम हे पाहत होते. एवढेच नाहीतर जोतीबा फुले यांच्या सत्यधर्म आणि सत्यशोधक समाजही सयाजीरावांना जवळचा वाटत होता. न्या. रानडे यांचे वर्ग मित्र ऋषितुल्य मामा परमानंद यांनी सयाजीरावास पत्र लिहून जोतिबा फुले यांना मदत करण्याची विनंती केली. फुल्यांचे कार्यकर्ते रामचंद्र धामणसकरांना सयाजीरावांनी बडोद्यात महत्त्वाच्या पदावर नोकरीस घेतले. पुढे ते धामणसकर बडोद्याचे दिवाण झाले.

या पार्श्वभूमीवर स्वामी हंसस्वरूप स्वामींना सनातन मंडळींनी बडोद्यात खास निमंत्रण देऊन बोलावले. बडोद्यातील दसरा मैदानात स्वामींची सायंकाळी व्याख्यानं ठरली. व्याख्यानास प्रचंड गर्दी होऊ लागली. आपला सनातन धर्म फार थोर आहे. पाश्चात्त्य ज्ञानाच्या आणि सुधारणांच्या मागे लागणे ही काहींची विकृती आहे. याकरिता धर्म रक्षणासाठी या नव्या सुधारणा आपण दूर ठेवल्या पाहिजे. राज्यकर्त्यांने त्याच्या आहारी जाऊ नये. स्वामींच्या भाषणांचा असा वृत्तांत पुण्यातील आणि बडोद्यातील काही वृत्तपत्रांनी आनंदाने प्रकाशित केला. हसंस्वरूप स्वामींची ही दहा व्याख्यानं म्हणजे एक प्रकारे सयाजीराव महाराजांच्या सामाजिक आणि धार्मिक उपक्रमास जाहीर आव्हानच होते.

महाराजांनी सरदेसाईंना बोलावलं, हंसस्वरूप स्वामींच्या व्याख्यानाचे वृत्तांत तुम्ही वाचले असतीलच. स्वामी आपल्या कामाविरोधात एक प्रकारे आव्हानच देत आहेत. त्यांना राजवाड्यात सन्मानाने बोलवा. दरबारात त्यांची भाषणं ठेवू. शहरातील प्रमुख चार पाचशे श्रोत्यांना आमंत्रणं पाठवा. उद्यापासून ही भाषणं ठेवू.

हुशार सरदेसाईंना हे विकतचं संकटं वाटू लागलं. स्वामींची भाषणं सत्य असल्याचा न्याय करण्याऐवजी दुधात विष कालवल्यासारखी असतात, हे त्यांनी ओळखलं होतं; पण महाराजांची आज्ञा मोडता येत नव्हती.

राजवाड्यातील आयने महाल दिवाणखान्यात रात्री ९ ते १०.३० वेळ ठरली. स्वामींना सन्मानाचं निमंत्रण गेलं. महाराजांनी पहिल्या व्याख्यानापूर्वी स्वामीचं आपल्या दालनात स्वागत केलं. महाराज म्हणाले, ''आपल्या भाषणांचा वृत्तपत्रातील गोषवारा मी वाचला. माझं यावर ढोबळ मत बनलं, आजवरच्या सनातनी ढोंगांनीच ही प्राचीन भारतभूमी अधोगतीस गेली. पाश्चात्य ज्ञान आणि शास्त्रांचा अवलंब करणं आजही गरज आहे.''

''आपण प्रथम माझी व्याख्यानं ऐका. त्यानंतर आपण यावर चर्चा करू.'' स्वामी म्हणाले, ''किती व्याख्यानात आपण विषय मांडणार आहात?'' महाराजांनी विचारलं. ''पाच दिवस बोलून विषय संपवीन.'' स्वामी म्हणाले. ''आम्ही तयार आहोत. विद्वान पंडितांच्या ज्ञानाची आम्ही कदर करतो.'' महाराज नम्रपणे म्हणाले. स्वामीसह आयने महालात आले. महाराजांनी स्वामींना राजवस्त्र देऊन गौरव केला आणि स्वामी बोलायला उभे राहिले.

हंसस्वरूप स्वामी चतुर वक्ते होते. भाषेवर प्रभुत्व असल्याने श्रोत्यांवर प्रभाव पडू लागला. तासभर त्यांनी सनातन हिंदू धर्माची महती ऐकवली. ऐकणारे भारावून गेले. दुसऱ्या दिवशी व्याख्यान संपल्यानंतर महाराज धामणसकारांना म्हणाले, ''दोन व्याख्यान ऐकून माझं मत बनलंय, स्वामींची विद्वता अन् वाचन अगदी बेताचं आहे. वकृत्वाच्या जोरावर ते छाप पाडतात. ठोस मुद्दे अजून आले नाहीत.''

पाचव्या दिवशी शेवटचं व्याख्यानं संपलं. स्वामींनी विजयी मुद्रेनं महाराजांकडे पाहिलं. महाराजांनी त्यांना विचारलं, ''आपलं सांगणं संपलं आहे ना?'' स्वामींनी होकार दिला.

महाराजांनी बसल्या जागेवरून श्रोत्यांकडे नजर फिरवली आणि म्हणाले, ''आपण सर्वांनी स्वामींची पाच दिवस व्याख्यानं ऐकलीत. याबद्दल अथवा याविरुद्ध कोणास काही सांगणे असेल तर पुढं या आणि बोला.'' सगळी सभा स्तब्ध झाली. सगळे एक दुसऱ्याकडे बघत होते. स्वामींच्या चेहऱ्यावर काही काळ आनंद दिसू लागला. काही क्षण शांततेत गेले. रात्रीचे 10.30 वाजून गेले होते. मंडळी घरी परतण्याच्या तयात होती.

सयाजीराव उभे राहिले. एकवेरीळ स्वामी हंसस्वरूप आणि श्रोतेवर्गाकडे नजर टाकून बोलू लागले. महाराज असखलित इंग्रजीत दीड तास बोलले. शेवटी म्हणाले, ''मी सगळ्यांना खूप वेळ ताटकळत ठेवलं त्याबद्दल माफी असावी'' आणि महाराज खाली बसले. स्वामी हंसस्वरूप पुन: उभे राहिले.

''महाराज, आपलं म्हणणं मला मान्य आहे. आपल्याला विरोध करण्याची माझ्यासारख्याची योग्यता नाही.'' स्वामींनी कबूल केले. आभारानंतर दरबार संपला. सगळे महाराजांच्या सडेतोड भाषणाची चर्चा करत घरोघर परतले. त्यावेळी रात्रीचे बारा उलटून गेले होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात धर्मनिरपेक्ष आधुनिक लोकशाही मूल्यांचा पाठपुरावा करणारा राजा अशी सयाजीराव महाराजांची ओळख

झाली, तरीही सयाजीराव माणसांच्या जीवनातील धर्माचे तौलनिक अभ्यास ते करू शकले. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, आर्यसमाज या सर्व धर्मांचा त्यांनी डोळसपणे अभ्यास केला, हे सृष्टीची सेवा-ईश्वराची मैत्री या वेळोवेळी केलेल्या भाषणातून लक्षात येईलच.

१ ऑक्टोबर, १९०१ ला बाळ गंगाधर टिळक यांनी 'श्री गायकवाड सरकार यांचा वेदांत' या शीर्षकाचा केसरीत अग्रलेख लिहिला. तो सयाजीरावांनी वाचला. टिळक करत असलेल्या राष्ट्रकार्याबद्दल सयाजीरावांना प्रेम होते. क्रांतिकारक आणि राष्ट्रप्रेमी मंडळींना सयाजीरांवानी मदत आणि पाठिंबा आहे, याचा टिळकांना महाराजांबद्दल आदर वाटत होता; पण सयाजीरावांनी हंसस्वरूप स्वामींच्या मतांचे केलेले खंडन टिळकांना रुचले नव्हते.

जोतीबा फुल्यांचे सहकारी आणि बडोद्याचे दिवाण रामचंद्र धामणसकरांना टिळकांची भूमिका आणि टीका आवडली नाही. टिळकांच्या अग्रलेखावर उत्तर पाठवावे, असे धामणसकर म्हणाले. यावर महाराज म्हणाले, ''वेदांत विषयावर आम्हाला बोलायचा अधिकार नाही, असे टिळक म्हणतात, ते मान्य करून या विषयाचा मी आणखी अभ्यास वाढविणार आहे. देव-देवतांबद्दल, गरिबांना लुबाडणाऱ्या ढोंगी साधू-अन् लफंग्याबद्दलचे मत मात्र कायम आहे. यावर आपण उत्तर नाही पाठवायचं. टिळकांनी अग्रलेखाच्या सुरुवातीस आम्हाला

सुशिक्षित व विद्याव्यासंगी म्हटलयं, त्यातच सर्व आलंय. टिळक आज जे राष्ट्रीय कार्य करतात, त्यापुढं ही टीका वैयक्तिक व किरकोळ स्वरूपाची आहे. आपण त्याकडे लक्ष देऊ नये.''

सयाजीरावांनी मनाचा मोठेपणा दाखवून विषय संपविला. सयाजीराव गायकवाड यांच्या पदरी वेगवेगळ्या पदावर वेगवेगळ्या जाती-धर्मांची माणसं काम करत होती. कट्टर हिंदुत्ववादी दादूमिया डॉ. नेने यांचे आजोबा-वडील सयाजीरावांचे खाजगी सचिव होते. वि.दा. सावरकरांच्या अभिनव भारत या चळवळीचे दाजी नागेश आपटे आणि मंडळीही जवळ होती. आर्यसमाज आणि महाराजांचे जवळचे संबंध होते. आर्यसमाजाचे कट्टर समर्थक पंडित आत्माराम हे शिक्षण विभागात महत्त्वाची कामगिरी बजावत होते. त्यांनी स्थापन केलेल्या आर्यकन्या विद्यालयास महाराजांचीच प्रेरणा होती. ब्राह्मणेतर चळवळीत महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचं त्याकाळात चांगलं बळ वाढलं होतं. ते सक्रिय कार्यकर्ते होते. महाराजांचे दिवाण रामचंद्रराव धामणसकर आणि खासेराव जाधव या बरोबर हिंदू धर्मशास्त्रातील महान तत्त्वज्ञ योगी अरविंदही काळी काळ खाजगी सचिव व नंतर बडोदा कॉलेजचे उपप्राचार्य होते आणि हिंदुस्थानमधील सर्व क्रांतिकारकांना प्रेरणा देण्याचं काम करत होते. जुनं आणि नव्याचा समन्वय साधू पाहणारे न्या. माधवराव रानडे यांच्याशीही सयाजीरावांची तेवढीच जवळीक होती. मुस्लिम आणि बौद्ध धर्मातील चांगल्या

धर्मतत्त्वांबद्दल ते जाहीरपणे आदर व्यक्त करीत. सारांश ते म्हणत, धर्माच्या आश्रयाने माणूस उभा राहतो आणि राजाच्या आश्रयाने धर्म उभा राहतो. धर्माने काळानुरूप बदलही स्वीकारला पाहिजे. सुधारणांचा स्वीकार केला पाहिजे. धर्मातील बदल स्वीकारले नाही तर धर्माची अवनती आणि नाश ठरलेला आहे. धर्माने मानवी उन्नतीचाही विचार केला पाहिजे. भोंदूपणा, कर्मकांड, माणसाची फसवणूक आणि शोषण करणारा धर्म खरा नाही. सर्व धर्मातील चांगले सार एकत्र करून एकाच मानवधर्माची स्थापना, ही आजच्या काळाची गरज आहे. राष्ट्र आणि समाज या दोन मूल्यांना हा मानवधर्म मदत करील अशी सयाजीराव गायकवाडांची आशा ही आमची आजची गरज आहे. सोबतचे त्यांचे विचार आपणास त्या मार्गाने जाण्याची प्रेरणा देतील.

●●●

# गझल

लाभो अम्हा तुकोबा शेजार निंदकांचे;
दारापुढे असावे ते दार निंदकांचे !

किरकोळ-थोर कोणी, आहे लहान-मोठा,
देवा किती घडवले आकार निंदकांचे !

टीका करून त्यांनी आम्हास शुद्ध केले;
मानू हजार वेळा आभार निंदकांचे !

मिळतात ठोक येथे साबत तऱ्हेतऱ्हेचे
दुनियेस स्वच्छ करती बाजार निंदकांचे !

ज्ञानेश्वरास छळती, पिळतात जे तुक्याला;
पाहून घ्या विठोबा अवतार निंदकांचे !

स्वर्गास थेट नेते त्यांची विमानसेवा;
झाले अनंत कोटी उपकार निंदकांचे !

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक'
 राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि
 सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि
 शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि
 जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specless & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com